# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O Office, Palghar**

Phone No. 02525-297032, Mob No.8669604078

Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)

E-mail : propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६६४ दि. २२/०८/२०२०

## पालघर जिल्हयातील गणेशोत्सव व मोहरम शांततेत पार पडण्याकरिता पालघर पोलीस सज्ज.

पालघर जिल्हयात दि. २२/०८/२०२० रोजी पासुन जिल्हयात गणेश उत्सव व मोहरम हे सण सुरु होत असुन सदरचे सण शांततेत पार पाडावे यासाठी पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन ठोस पावले उचलण्यात आलेली आहेत. पालघर जिल्हयात जवळपास १२६६ सार्वजनीक व ३९९९४ खाजगी ठिकाणी गणपती मुर्तीची स्थापना होणार आहे. सदर बंदोबस्त कामी जिल्हयातील ०२ अपर पोलीस अधीक्षक, ७ उपविभागीय पोलीस अधिकारी व १०१ पोलीस अधिकारी, १२२६ पोलीस कर्मचारी तसेच ०२ एसआरपीएफ प्लाटून, ५८५ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आला आहे. पालघर जिल्हयातील सर्व प्रभारी अधिकारी व सर्व उपविभागिय अधिकारी यांची गणेशोत्सव व मोहरम या सणाच्या अनुषंगाने बैठक घेवुन योग्य त्या सुचना दिलेल्या आहेत. कोणतेही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्याकरिता पोलीस ठाण्यामध्ये राखीव पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर लाठी/हेल्मेट/ढाल/अश्रुधुर आदी साधनासह प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना तयार ठेवण्यात आलेले आहे ते कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्यास २४ तास सज्ज ठेवण्यात आलेले आहेत. प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर दंगा काबु योजना राबविण्यात येत असुन गणेशोत्सव व मोहरम सणाच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत कॉर्नर मिटींग, पायी गस्त प्रभावीपणे करण्यात येत आहे. अवैध दारु, अंमली पदार्थ व जुगार धंदे आदींचे उच्चाटन करण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे. पोलीस ठाणे स्तरावरील रेकॉर्ड वरील गुन्हेगार तसेच अवैध धंदे करणारे आदींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येत असुन त्यांच्या हालचालीवर काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत आहे. पोलीस मुख्यालय येथे जलद प्रतिसाद पथक व दंगल नियंत्रण पथक ठेवण्यात आलेले आहे. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी पालघर पोलीस २४ तास सतर्क आणि सज्ज आहेत.

जिल्हयातील सर्व नागरिकांना पालघर पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, सण साजरे करताना सामाजिक भान ठेवुन आपली स्वतःची व इतरांची योग्य काळजी घेवुन सण साध्या पद्धतीने साजरे करावेत. तसेच सण साजरे करताना चार पेक्षा जास्त लोक एकत्र येऊन मा. जिल्हाधिकारी पालघर यांनी दिलेल्या मनाई आदेशाचा भंग करुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. तरी आपणास कोणताही अनुचित प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ खालील दिलेल्या मोबाईल नंबरवर पोलीस नियंत्रण कक्ष पालघर येथे संपर्क साधावा.

**नियंत्रण कक्ष संपर्क क्र. ८६६९६०४१००,९७३०७११११९, ९७३०८११११९**

Scanned with CamScanner